International Journal of Researches in Social Science and Information Studies (IJRSSIS)
September 2013
Issue-1, Volume-I
Online Journal
ISSN No. 2347-8268

# जागतिकीकरणाचे साहित्यातील प्रतिबिंब

**प्रा. डॉ. हिराजी बनपूरकर**
मराठी विभाग प्रमुख
कर्मवीर दादासाहेब देवतळे महाविद्यालय चामोर्शी जि. गडचिरोली

आज आपण सगळेच पूर्वी न अनुभवलेल्या संक्रमणाच्या अवस्थेतून जात आहोत. सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक क्षेत्रांमध्ये उत्पन्न झालेल्या संभ्रमाच्या मुद्रा पाहतो आहोत. गावे, शहरे बदलत आहेत. पुष्कळदा असे वाटते की आपण अवाढव्य अशा बाजारपेठेतून हिंडतो आहोत. आजच्या या स्थितीत संस्कृती, भाषा, साहित्य यांचे भवितव्य काय या प्रश्नाने आपण अस्वस्थ आहोत. याशिवाय अनेक प्रश्न आपल्या मनात आहेत. स्पेस मिळाली की आपण प्रश्न मांडायला लागतो. काही वेळा आपल्याला अशी स्पेस तयार करावी लागते. झाडीपट्टी रंगभूमी ही अशा स्पेसचे उत्तम उदाहरण आहे. उर्वरित महाराष्ट्राला कितपत कल्पना आहे कोण जाणे. झाडीपट्टीची दंडार ही परंपरेने चालत आलेली लोककला आहे. दंडार म्हणजे हातात डहाळी घेऊन केलेला नाच असा एक अर्थ दिलेला आहे. म्हणजे हे सृजनाचे नृत्य आहे. जंगलात, निसर्गात राहणाऱ्या लोकांचा निर्मितीचा उत्सव. आता सर्वत्र पसरलेल्या जंगलात कार्पोरेट हत्ती शिरून उच्छाद मांडायला सिध्द झालेले आहेत.

साम्राज्यवाद नष्ट झाला आहे. परंतु साम्राज्ये आपल्या डोळ्यांसमोर आकार घेत चालली आहेत. जागतीकरण हे या साम्राज्याचे नाव आहे. या साम्राज्यात आधुनिकता आणि समृध्दी यांची अमिषे दाखवली जातात. परंतु प्रत्यक्षात सामाजिक दुभंगलेपण आणि सांस्कृतिक मागासलेपण यांचे पोषण केले जाते.

व्यक्तीचे बाहेरच्या जगाशी असलेले संबंध, बाजारपेठेचा प्रभाव आणि त्याच्याशी निगडित उपभोक्तावादी संस्कृती आणि धार्मिकता व धर्मजातिवाद यांचा उदय या तीन गोष्टींचा अनेक विचारवंतानी परामर्ष घेतला आहे. व्यक्तीच्या दृष्टीने सामाजिक प्रश्न महत्वाचे राहिलेले नाहीत. सार्वजनिकतेच्या ठिकाणी वैयक्तिकता आलेली आहे. व्यक्ती स्वतःच्या प्रश्नांमध्ये जास्त गुंतत गेली आहे. बाजारपेठेचे स्वरूप बदलले आहे. पूर्वी अप्राप्य अशा वस्तू व्यक्तीच्या हाताशी आलेल्या आहेत असा आभास तयार केला जातो. परंतु व्यक्तीची वास्तविक स्थिती आणि तिच्या निवडीला केले जाणारे आवाहन यांत विसंगती तयार होते. वस्तूंमध्येच सर्वस्व आहे, खरा आनंद आहे असे वाटणे, वस्तूंनी झपाटले जाणे अशी एक मानसिक अवस्था तयार होते. आर्थिक क्षमता नसल्याने बहुसंख्यांना त्या मिळवता येत नाहीत.


A Four-monthly Journal By
Vishwashanti Multipurpose Society,
(Global Peace Multipurpose Society)

सर्वसामान्य माणसांच्या सुखदुःखांची हायस्ट्रीट फिनिक्सच्या मोराला काही पर्वा नसते. तो चमचम दिव्यांचा पिसारा फुलवून दिमाखात उभा असतो. जयंत पवार यांची 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' ही कथा जागतिकीकरणावरचे, मुक्त बाजारपेठेवरचे, नवमध्यमवर्ग आणि कनिष्ठ वर्ग यांच्यात पडलेल्या दरीवरचे एक प्रखर भाष्य आहे.

जागतिकीकरण ही भिन्न भिन्न आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक विचारप्रवाहांना सामावून घेणारी संज्ञा आहे. जागतिकीकरण ही एक अवस्था आहे आणि सिध्दान्तही आहे. वर्तमानकाळात जागतिकीकरण या शब्दात विविध अर्थच्छटा दडलेल्या आहेत. उदाहरणार्थ : मुक्त बाजारपेठ, आर्थिक उदारीकरण, राजकीय– अर्थिक–सांस्कृतिक जीवनावर पाश्चात्य धारणांचा प्रभाव, पश्चिमीकरण किंवा अमेरिकीकरण, माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार, इंटरनेट क्रांती, जागतिक एकात्मता, इत्यादी. जागतिकीकरणाची ही अवस्था एक अपूर्ण अवस्था आहे. भांडवलशाहीचा हा पुढचा टप्पा आहे. वाफेवर चालणारी जहाजे, टेलिग्राम, टेलिफोन, रेल्वे ही भांडवलशाहीची संचार साधने होती. प्रगत भांडवलशाहीला संगणक, उपग्रहांवर आधारित दृक्श्राव्य माध्यमे, भ्रमणध्वनी, द्रुत आंतरराष्ट्रीय विमानवाहतूक ही संचार–संज्ञापन साधने मिळालेली आहेत. समाजवैज्ञानिकांच्या मते जागतिकीकरण या संज्ञेत सामाजिक अस्तित्वाशी निगडित स्थल आणि काल या संकल्पनांतील मूलभूत बदलांचा निर्देश आहे.

मार्शल मॅकलुहान यांनी 1967 मध्ये म्हटले होते : काळ संपला आहे, अवकाश नाहीसा झाला आहे. आपण आता वैश्विक खेड्यात (ग्लोबल व्हिलेजमध्ये) राहतो आहोत. तंत्राज्ञानाच्या विकासामुळे काल आणि अवकाश या संकल्पना बदलल्या आहेत. वाहतुकीची गतिमान साधने (रेल्वे, विमान) आणि संज्ञापनाची साधने (सॅटेलाइट फोन, संगणक) ही भौगोलिक अंतर आणि अवकाशाची जाणीव बदलण्याची काही कारणे आहेत. मानवी अनुभवाच्या संदर्भात जवळ/दूर या संकल्पना बदलल्या आहेत.आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि विविधवस्तुभंडारे (मॉल्स) ही आजच्या जगाची प्रतीके आहेत. विविध बाजारपेठा एकमेकींच्या जवळ आलेल्या आहेत. किंवा साऱ्या जगाची एक बाजारपेठ झालेली आहे. जागतिकीकरणाचा अप्रादेशिकीकरणाशी, उत्तरराष्ट्रीयतेशी संबंध आहे. त्यात भौगोलिक आणि राजकीय सरहद्दींपलीकडचा परस्परांशी अनुबंध अभिप्रेत आहे. देशादेशांमध्ये तटबंदी नसाव्यात हे यामागचे तत्व आहे. टेलिकम्युनिकेशन, डिजिटल कंप्युटर्स, ऑडिओव्हिज्युअल मीडीया या गोष्टी सगळ्या सरहद्दी ओलांडतात. कोणत्याही देशातून दुसऱ्या कोणत्याही देशातील व्यक्तीला इ–मेल करता येते. मुक्त बाजारपेठेमुळे वस्तूही सरहद्दी ओलांडतात. परंतु माणसांच्या मुक्त संचाराला परवानगी नाही. व्हिसा असल्याशिवाय एका देशातून दुसऱ्या देशात जाता येत नाही. के. एन.



A Four-monthly Journal By
Vishwashanti Multipurpose Society,
(Global Peace Multipurpose Society)

पणिक्कर यांच्या मते काही शब्द आपला मूळ अर्थ लपवून ठेवतात. जागतिकीकरण हा सौम्य शब्द वर्चस्व या शब्दाऐवजी वापरला जातो. त्याला जे वास्तविक पाहता अभिप्रेत असते त्याहून तो वेगळेच काही सुचवत असतो. समान वाटा आणि स्वेच्छया सहभाग असे म्हटले जाते. परंतु असमान विकासाच्या समकालीन जागतिक व्यवस्थेत असमानतेशिवाय दुसरे काही हाती लागत नाही. पणिक्कर यांच्या मते भारतासारख्या देशांसाठी जागतिकीकरण म्हणजे गुलामी.

जागतिकीकरण हे शेतीत वापरल्या जाणाऱ्या दंताळयासारखे आहे. त्याला अनेक दाते आहेत. मानवीजीवनाच्या आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक विभागांना त्याने व्यापलेले आहे. त्यामुळे वेगवेळ्या विद्याशाखांमध्ये त्याच्या भिन्न भिन्न पैलूंचा विचार केला जातो. अर्थशास्त्रात जागतिकीकरण म्हणजे व्यापार, पैसा, व्यापारी प्रतिष्ठाने, सावकारी पेढ्या, भांडवल. राज्यशास्त्राच्या दृष्टीने सत्ता, युध्द, शांतता, राजवटी, अशासकीय, सेवा संघटना. समाजशास्त्रात जागतिकीकरणाच्या दृष्टीने मानवगटांचा, त्यांच्यातील संघर्षांचा, वर्गांचा, राष्ट्रीयतेचा, सामाजिक करारांचा विचार होतो. मानसशास्त्राच्या दृष्टीने जागतिक कृतींचे विषय आणि लक्ष्य म्हणून व्यक्तींकडे पाहिले जाते. मानवशास्त्राच्या कक्षेत जागतिकीकरणाच्या संदर्भात संस्कृतीची सरमिसळ, स्वीकार–संघर्ष–विलीनीकरण हे विषय येतात. संज्ञापनविद्येच्या कक्षेत जागतिकीकरणाच्या संदर्भात माहिती तंत्रज्ञान, आंतरजाल (इंटरनेट) हे विषय येतात. भूगोल विषयाच्या अंतर्गत अवकाश या संकल्पनेत सामावणाऱ्या सर्व गोष्टी समाविष्ट होतात.

सध्याचे जागतिकीकरण हे पूर्णपणे आर्थिक स्वरूपाचे आहे. या आर्थिक जागतिकीकरणाला जगभर कार्यरत असलेल्या संज्ञापनव्यवस्थेचे सहाय्य झालेले आहे. त्यामुळे भाषा, साहित्य, कला, संस्कृती या गोष्टी प्रभावित झालेल्या आहेत. आर्थिक जागतिकीकरणाचे इतरही जीवनक्षेत्रांवर परिणाम झालेले दिसतात. उत्पादनांसाठी जग हीच बाजारपेठ झाल्यामुळे आपल्या देशाबाहेरची उत्पादने उपभोक्त्यांना मिळू लागली. अर्थात विकसनशील देशांच्या संदर्भात बरीचशी उत्पादने वरच्या वर्गासाठीच आहेत हे दिसते. वित्तीय बाजारपेठांमुळे भांडवलाचा पुरवठा होऊ लागला. परकीय गुंतवणुकीसाठी विविध देश उत्सुक झाले. त्यातून बहुराष्ट्रीय कंपन्या, कार्पोरेशन्स यांची आर्थिक सत्ता तयार झाली. जागतिक सरकार अजून अस्तित्वात आलेले नाही. मात्र जागतिक व्यापार संघटना, वर्ल्ड बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांची सत्ता जगभर चालत असलेली दिसते. प्रगत भांडवलशाहीचे प्रगत वसाहतवादात रूपांतर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जागतिकीकरण हे पुनर्वसाहतीकरण असून जागतिक निगमांच्या (ग्लोबल कार्पोरेशन्सच्या) अमलाखाली भिन्न भिन्न देशांच्या आर्थिक व्यवस्था एकत्रित करणे हे त्यामागचे उद्दिष्ट आहे असे मत मांडले जाते. फायबर ऑप्टिक कम्युनिकेशन, उपग्रह, इंटरनेट यांच्या सहाय्याने दूरदूरपर्यन्त माहितीचा महापूर पोचतो यात

शंका नाही. मात्र ही साधने ज्या मानवसमूहांना उपलब्ध नसतात, ते या माहितीपासून वंचित राहतात. एक नवी विषमता अस्तित्वात येते. या विषमतेला डिजिटल डिव्हाईड असे म्हटले जाते. आयटी हॅव्ज आणि आयटी हॅव नॉट्स असे दोन वर्ग तयार होतात. सारे जगच बाजारपेठ झाल्याने स्पर्धेत टिकण्यासाठी मालाची गुणवत्ता वाढवणे आवश्यक झाले आहे. आधुनिक तंत्रज्ञान असलेले पुढे जाणार यात शंका नाही. विकसित देशांनी विकसनशील देशांमध्ये सुरू केलेली औद्योगिक प्रतिष्ठाने पर्यावरणाचे नियम पाळतातच असे नाही. विकसनशील देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीच्या शोषणाला कोणताही अटकाव असत नाही अशी दृश्ये दिसतात. विविध राष्ट्रांमधले लोक शिक्षण, पर्यटन, उद्योग या निमित्ताने भिन्न भिन्न देशांमध्ये जाऊ लागले, तेथे वास्तव्य करू लागले. त्यामुळे बहुसांस्कृतिकतेची जाणीव होऊ लागली. त्याचबरोबर संस्कृतींचे कृत्रिम एकरूपीकरणही अस्तित्वात येत चालले आहे असे दिसते. आजच्या जगात बहुसंख्य, विशेषतः शहरी, निमशहरी लोक एकाच प्रकारचे संगीत ऐकतात, तेच खेळ पाहतात, त्याच दूरचित्रवाणी—मालिका पाहतात. हॉलिवूडचे इंग्रजीतले अन्य देशी भाषांमध्ये डब केलेले चित्रपट, पॉप म्युझिक, फास्ट फूड, कोक, पेप्सी, नायकी बूट सर्वत्र आढळतात. देशातल्या भिन्न भिन्न भागातल्या हस्तकलांच्या, संगीताच्या, लोकनाट्याच्या परंपरा क्षीण होत जातात. कलाकृतीकडे कलाकृती म्हणून न पाहता खरेदी—विक्रीची वस्तू,गृहसजावटीची वस्तू म्हणून पाहिले जाते. एतद्देशीय गोष्टींपेक्षा परदेशी वस्तू, परदेशी कल्पनाप्रणाली आत्मसात करण्याकडे कल वाढताना दिसतो. यातूनच उपभोक्तावादाची वा चंगळवादाची निर्मिती होत असते. मूलभूत महत्त्वाच्या गोष्टीसंबंधीचे नवे तंत्रज्ञान स्वीकारावे असे वाटणे स्वाभाविक आहे, परंतु ते मिळतेच असे नाही. त्यामुळे विकसनशील देशातील लोकांच्या बुध्दीचा, कष्टाचा उपयोग करून घेणे एवढेच उरते. जागतिकीकरणात इंग्रजी भाषेला आत्यंतिक महत्त्व आलेले आहे. त्यामुळे इतर भाषांचे, विशेषतः भारतासारख्या देशातल्या प्रादेशिक भाषांचे, बोलीचे भवितव्य काय हा प्रश्न निर्माण होतो. एक भाषा जाते तेव्हा त्या भाषेतले सगळे संचित नाहीसे होते.

भारतासारख्या कृषीप्रधान देशावर आर्थिक जागतिकीकरणाचा किती गंभीर विपरीत परिणाम होतो याविषयी वंदना शिवा यांनी लिहिले आहे : आर्थिक जागतिकीकरणामुळे बीज—बीयाणे उद्योगाचे केंद्रीकरण, जागतिक व्यापारी प्रतिष्ठानांचा (ग्लोबल कार्पोरेशन्स) कृषीव्यवसायात प्रवेश, कीटकनाशकांचा वाढता वापर, वाढत चाललेली कर्जे, निराशा त्यामुळे लहान शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या या गोष्टी घडत आहेत. भांडवल गुंतवणारी कार्पोरेट—नियंत्रित कृषिव्यवस्था अस्तित्वात येते आहे. अशा स्थितीत गरीब शेतकरी टिकून राहणे अशक्य झाले आहे. जागतिकीकरणात निर्यातीला

प्राधान्य आहे. त्यामुळे शेतकरी अन्नधान्य पिकविण्याऐवजी निर्यात करता येईल अशी पिके घेऊ लागले आहेत. उत्पादनखर्चात वाढ झाल्यामुळे कर्ज काढण्याची प्रवृत्ती वाढीस लागली. पाहिजे तसे उत्पन्न झाले नाही किंवा भाव मिळाले नाहीत तर शेतकरी बुडतो, तो वैफल्याने ग्रासला जातो.

विकसित देशांनी पुरस्कृत केलेला जागतिकीकरणाचा सिध्दान्त विकसनशील देशाला अमलात आणता येऊ शकतो का, हा एक प्रश्न उपस्थित होतो. जागतिकीकरणामुळे खरोखरच नवे तंत्रज्ञान येते का हाही एक प्रश्न आहे. परदेशी कंपन्या इथली जमीन, पाणी आणि मनुष्यबळ यांचा वापर करतात. शीतपेये, साबणे, सौंदर्यप्रसाधने यांचे कारखाने निघतात. मात्र संगणकासाठी आवश्यक असलेल्या भागांची निर्मिती करणारे कारखाने निघत नसतात. खुल्या बाजारपेठेमुळे उपभोग्य वस्तुंची आयात होते, त्या प्रमाणात निर्यात होते का हा प्रश्नही उपस्थित होतो. एकंदरीत आर्थिक—औद्योगिक क्षेत्रावर बहुराष्ट्रीय कंपन्यांचा प्रभाव आहे ही वस्तुस्थिती आहे. परदेशी भांडवलाच्या सहयोगाने उद्योग उभारणारे सुपीक जमिनीची, परदेशी भांडवलाच्या सहयोगाने उद्योग उभारणारे सुपीक जमिनीची, घनदाट जंगलाची, पाण्याची, वस्त्यांची पर्वा करीत नसतात हेही दिसून येते. जागतीकीकरण या विषयावर मराठीत बरेच लेखन झालेले आहे. बहुतांश लेखनात जागतिकीकरणाविषयी चिंता व्यक्त करण्यात आली आहे. उदाहरणार्थ, वसंत पळशीकर यांच्या लेखांचे शीर्षकच 'जागतिकीकरण आणि भारतीय समाजासमोरील यक्ष प्रश्न' असे आहे. आपण सारेच ही नवी जागतिक अर्थव्यवस्था प्रत्यक्षात मान्य करीत आहोत, गत्यंतरच नाही म्हणून तिच्याशी जुळवून घेत आहोत ही वस्तुस्थिती मान्य करावयास हवी, आपण या व्यवस्थेचा सामना करावयास हवा असे ते म्हणतात. जागतिकीकरणाचा परिणाम सामाजिक न्यायाशी संपूर्णतः विसंगत झालेला आहे. त्याचप्रमाणे जागतिकीकरणात लोकशाहीचे खच्चीकरण झालेले दिसते असे आनंद तेलतुंबडे सांगतात. जागतिकीकरणाला थोपवून धरणारे देशी परंपरासारखे दुसरे कोणतेही अमोघ शस्त्र नाही असे भालचंद्र नेमाडे यांचे मत आहे. जागतिकीकरणाचा शेतीक्षेत्रावर अनिष्ट परिणाम झालेला आहे असा गोविंद पानसरे यांचा निष्कर्ष आहे. नव्वदीच्या दशकात खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाचा जणूकाही आगडोंबच उसळला या भाषेत विश्राम गुप्ते यांनी या अवस्थेचे वर्णन केले आहे. के. एन. पणिक्कर विचारतात, नव्वदच्या दशकातच का, पन्नासच्या किंवा साठच्या दशकात का नाही? त्यांच्या मते द्विध्रुवीय जगाच्या राखेतून जागतिकीकरण उदयास आले आहे. समाजवादी गटाच्या पडझडीमुळे भांडवलवादी शक्तींना विजयाच्या नव्या युगाचा आरंभ करण्यासाठी मार्ग मिळाला. त्यांना विरोध करणारे कोणी उरले नव्हते. भारतासारख्या देशाने विरोध करावयास हवा होता, तसे घडले नाही. उलट एका

बहुराष्ट्रीय प्रतिष्ठानाच्या उपाध्यक्षाने उदारीकरण म्हणजे दुसरे स्वातंत्र्य असे घोषित केले. हे दुसरे स्वातंत्र्य बूर्ज्वाजीपुरते मर्यादित आहे आणि बहुसंख्य भारतीयांना त्याचा काही लाभ नाही.

जगतिकीकरणाच्या प्रक्रियेत समाजात बदल होतील, आर्थिक स्थितीत बदल होतील, समाजातील उच्च, मध्यम व कनिष्ठ वर्ग यांच्या स्थितीत बदल होतील, मात्र हे बदल चांगलेच आहेत, किंवा असतील असे म्हणता येत नाही. आनंद तेलतुंबडे यांनी म्हटले आहे : जागतिकीकरणामुळे देशादेशांतील, प्रदेशाप्रदेशांतील, व्यक्तीव्यक्तींतील विषमता न भूतो न भविष्यती अशा प्रमाणावर वाढलेली आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत कनिष्ठ वर्गापुढे, कनिष्ठ मध्यमवर्गापुढे उच्च वर्गाचे, उच्च मध्यमवर्गाच्या जीवनरीतीचे आदर्श असतील यात शंका नाही. विश्राम गुप्ते यांनी नवमध्यमवर्ग ही संज्ञा वापरली आहे. जागतिकीकरणातला  हा महत्वाचा घटक आहे. तो उपभोक्ता आहे. जागतिकीकरणाने त्याच्या आर्थिक मिळकतीत बरीच वाढ झालेली आहे. या नव– मध्यमवर्गात व्यवस्थापन–विद्याविभूषित, दृकश्राव्यमाध्यम– पारंगत, संगणकतज्ज्ञ, खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रांतील उच्चपदस्थ, अभियांत्रिकी व्यवस्थापनविद्या, वैद्यकीय शिक्षणसंस्थांचे संचालक इत्यादींचा समावेश होतो.

नवमध्यमवर्गाच्या पलीकडे मोठा कनिष्ठ वर्ग, कनिष्ठ मध्यमवर्ग आहे. त्यांचे भवितव्य काय या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. तेलतुंबडे यांनी म्हटले आहे : साधारणतः जागतिकीकरण सबलांना अधिक सबल व दुर्बलांना अधिक दुर्बल करते; मग तो देश असो, समाज असो वा व्यक्ती. जगण्यात निर्माण होणारी स्पर्धा हादेखील या प्रक्रियेतील एक अपरिहार्य भाग आहे. त्यातून विशिष्ट अशी मानसिक अवस्था तयार होते. क्षोभ, चिंता, त्रास. दैनंदिन जीवनातील छोट्या गोष्टींनी क्षोभ उत्पन्न होतो. काहीतरी भयानक घडेल असे वाटत राहते. प्रकृती, पैसे, कुटुंब यांच्याविषयीच्या काळजीने मन व्यापून जाते. ही चिंता अवास्तव असते आणि प्रमाणाबाहेरही असते. परंतु त्यामुळे दैनंदिन जीवन चिंता आणि भीतीने ग्रासले जाते.

प्रवीण दशरथ बांदेकर यांनी खेळखंडोबाच्या नावानं या दीर्घ कवितेत लिहिले आहे :

भेदरलेल्या माणसांना कळत नाहीये
आजच्यापुरतंच जगावं की आतापुरतंच
आपल्यापुरतंच जगावं की स्वत:पुरतंच
किंवा जगण्यासाठीच असावं की आहोत म्हणून जगावं

'जागतिकीकरणामुळे वस्ती नव्हे, तर शॉपिंग मॉल जन्माला येतो, आणि नागरीक नव्हे, तर ग्राहकनिर्मिती होते' असे संजीव खांडेकर यांनी म्हटले आहे ते यथार्थच आहे. जे. जी. बॅलर्ड यांच्या

'किंगडम कम' या कादंबरीतील मध्यवर्ती स्थळ शॉपिंग मॉल हेच आहे. त्या कादंबरीत उपभोक्तावादाचे फॅसिझममध्ये कसे रूपांतर होते हे दाखवले आहे. पणिक्कर यांनी उपभेक्तावादाचा धर्मांधता–जातीयता यांच्याशी संबंध जोडलेला आहे. धर्मांधता–जातीयता यांचाही फॅसिझमशी संबंध आहे.

नव्वदच्या दशकात जागतिकीकरणाचा उदय झाला. त्याच दशकात कविता लिहू लागलेल्या पिढीच्या कवितेत जागतिकीकरणाचे पडसाद उमटणे स्वाभाविकच आहे.

खुल्क है खुदाका आणि मुल्क जनताका
हुकूम कंपनीका, नाचो झिंग लपालपा

या शब्दांत अरूण काळे यांनी मुक्त बाजारपेठेचे वर्णन केले आहे.

मेगामॉल शॉपिंगमध्ये आपले वस्तूंमध्ये कसे रूपांतर होत जाते हे हेमंत दिवटे यांच्या कवितेत दिसते. आपण व्हिस्पर नॅपकिन आहोत, हग्गीजचा पॅक आहोत, उंची कॅमे साबू आहोत, किंवा यार्डले, लक्स इंटर नॅशनल आहोत असे निवेदकाला वाटू लागते.

की मी काटा–चमचा आहे?
ज्याने चाळिशीचा एक मराठी माणूस
मॅगी नूडल्स खातोय
की मी टीव्ही आहे?
ज्याच्यासमोर अख्खं कुटुंब बसलंय
मला पाहत, जेवत, माझ्यावरची चॅनल्स बदलत.....

या व्यवस्थेत जगत असताना व्यक्ती परात्म होते, ती स्वतःपासून दुरावते, ती यंत्राचा भाग बनते आणि उपभोक्तादेखील वस्तुरूप पावतो. त्याला निवड आहे, निवडीची संधी आहे हा आभास असतो. खरे तर त्याला निवडीची संधी नसते. गोष्टी त्याच्यावर लादलेल्या असतात. तोही एक वस्तूच असतो हे या कवितेत अधोरेखित झाले आहे. वस्तूंची ओढ वाटणे आणि स्वतःच वस्तू होऊन जाणे हे परात्मतेचे लक्षण आहे. जागतिकीकरणाचे हे सांस्कृतिक आक्रमण होय आणि ते भयावह आहे. मानवी मनाचा आणि बाह्य जगताचा संवादी संबंध आवश्यक असतो. बाह्य जगतात निसर्ग आणि मानव हे महत्वाचे घटक असतात. निसर्गाचा आणि माणसाच्या जगण्याचा संबंधही संवादी असणे आवश्यक असते. कृषिजनसंस्कृतीत असा संवाद अंतर्भूत होता. जागतिकीकरणाचा कृषिजनसंस्कृतीमधील संवादावरच आघात झालेला आहे. बाहेरच्या वाढत चाललेल्या कोलाहलात वावरत असताना व्यक्तींच्या मनातला कोलाहलही वाढत चाललेला आहे.

**संदर्भ**

1) आठलेकर, मंगला, '1950 नंतरची मराठी कथा' 'अक्षरगाथा', अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे वार्षिक 1900–2000

2) गाडगीळ, गंगाधर, 'स्वातंत्र्योत्तर कालखंडातील कथा' 'अक्षरगाथा', अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे वार्षिक 1900–2000

3) प्रकाश देशपांडे केजकर, 'मराठी कविता–नवी वळणे', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 1994

4) जाधव रा. ग., 'साठोत्तरी मराठी कविता व कवी', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 1997

5) तेलतुंकडे, आनंद, 'समाज प्रबोधन पत्रिका', सातारा, जाने–मार्च 2001